आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२ जानेवारी २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जमीन महसूल कायद्यात आकारी पड जमिनीसंदर्भातल्या तरतुदीत सुधारणा करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय, सर्व समाज विकास महामंडळांची एकत्र वेबसाइट होणार
- संतोष देशमुख हत्या प्रकरणी सरकारी वकील म्हणून उज्ज्वल निकम यांच्या नियुक्तीची सरकारची तयारी, बाहेरच्या राज्यात खटला चालवण्याची विरोधी पक्षांची मागणी
- देशातल्या शेअर बाजारात जोरदार तेजी, सेन्सेक्स पुन्हा ८० हजारांच्या उंबरठ्यावर, निफ्टी २४ हजारांच्या पलीकडे

**आणि**

- स्वप्नील कुसाळे, सचिन खिलारी यांना अर्जून पुरस्कार तर दीपाली देशपांडे यांना द्रोणाचार्य पुरस्कार जाहीर, मुरलीकांत पेटकर यांचा जीवनगौरव पुरस्कारनं सन्मान

**<><><><><>**

महाराष्ट्र जमीन महसूल कायद्यात आकारी पड जमिनीसंदर्भातल्या तरतुदीत सुधारणा करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर मंत्री उपस्थित होते.

या सुधारणांमुळे, शासकीय थकबाकीपोटी लिलाव होऊन सरकारजमा झालेल्या सुमारे ४ हजार ८४९ एकर आकारी पड जमिनी शेतकऱ्यांना परत दिल्या

जातील. अशा जमिनी थकबाकीची देय रक्कम आणि त्यावरचं व्याज १२ वर्षाच्या आत भरलं तर मूळ खातेदारांना परत करण्याची तरतूद कायद्यात आहे. मात्र १२ वर्षांनंतर जमीन परत करण्याची तरतूद नव्हती. आता अशा जमिनी, प्रचलित बाजारमूल्याच्या २५ टक्के रक्कम वसूल करून मूळ खातेदारांना किंवा त्यांच्या वारसांना परत करण्याची तरतूद महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम २२० मध्ये करायला मंत्रिमंडळानं मान्यता दिली. तसं विधेयक विधानमंडळाच्या आगामी अधिवेशनात सादर केलं जाईल.

सर्व समाज विकास महामंडळं एका आयटी प्लॅटफॉर्मवर आणण्याचा निर्णयही या बैठकीत झाला.

प्रत्येक पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी युनिक आयडी तयार करण्याचा निर्णय यावेळी झाला. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी बातमीदारांशी बोलताना सांगितलं....

**होल्ड - बाईट - मुख्यमंत्री**

'ई ऑफिस'च्या धर्तीवर 'ई-कॅबिनेट'चं सूतोवाच या बैठकीत करण्यात आलं. राज्य मंत्रिमंडळाचा संपूर्ण मसुदा टॅबच्या माध्यमातून हाताळला जावा, यातून कागदाची बचत होऊन पर्यावरण जपले जाईल, ही त्यामागची भावना असल्याचं सांगण्यात आलं.

शासकीय कर्मचाऱ्यांचं वेतन आणि भत्ते प्रदान करण्यासाठी मुंबई जिल्हा मध्यवर्ती, अर्थात मुंबै बँकेत वैयक्तिक खातं उघडायला, तसंच शासनाच्या सार्वजनिक उपक्रम आणि महामंडळांकडे असलेल्या अतिरिक्त निधीच्या गुंतवणूकीसाठी मुंबै बँकेला प्राधिकृत करायलाही मंत्रिमंडळानं आज मंजुरी दिली.

माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल या बैठकीत शोकप्रस्ताव मांडून, मंत्रिमंडळानं त्यांना आज आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

मंत्रालयात येणारे नागरिक, मंत्रालयीन अधिकारी आणि कर्मचारी यांना विनासायास, सुलभ प्रवेश मिळावा आणि सुरक्षाही भक्कम रहावी, यासाठी कृत्रिम बुद्धमतेचा उपयोग करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिले आहेत. मंत्रालयात प्रत्येक मजल्यावर सुरक्षा जाळीचं काम पूर्ण करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले.

**<><><><><>**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी विधीज्ञ उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यास सरकार अनुकूल आहे. यासंदर्भात निकम यांच्याशी चर्चा झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी बातमीदारांशी बोलताना दिली.

आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्र्यांकडे ही मागणी केली आहे. याशिवाय या प्रकरणातल्या आरोपींना बीडच्या पोलिस कोठडीतून इतरत्र हलवण्याची मागणीही केल्याचं धस यांनी सांगितलं. विधान परिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी, हा खटलाच बीड जिल्ह्याऐवजी दुसऱ्या ठिकाणी चालवावा अशी मागणी केली आहे. छत्रपती संभाजीनगर इथं आज वार्ताहर परिषदेत बोलतांना त्यांनी ही मागणी केली.

दरम्यान, या संपूर्ण प्रकरणावर आपल्या मंत्रिपदी राहण्यामुळे काहीही परिणाम होणार नसल्याचं, अन्न नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी म्हटलं आहे. हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवून सर्व आरोपींना फासावर चढवण्याची मागणी मुंडे यांनी केली. या प्रकरणात आता सीआयडी, एसआयटी आणि न्यायालयीन अशी तिहेरी चौकशी सुरू असून तपासाला वेग आल्याचंही दिसत आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

देशात शेतकरी सबल करण्याबरोबरच तीन कोटी महिलांना लखपती बहीण करण्याचा प्रधानमंत्र्यांचा संकल्प असल्याचं केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. अहिल्यानगर जिल्हयातल्या बाभळेश्वर इथं कृषि विज्ञान केंद्रात आयोजित शेतकरी संवाद कार्यक्रमात ते आज बोलत होते.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्रालयानं तुरुंगांसाठी नवीन दिशानिर्देश जारी केले आहेत. नवीन नियमावलीनुसार आता तुरुंग अधिकाऱ्यांना जाती आधारित भेदभाव, वर्गीकरण आणि विलगीकरण करता येणार नाही.

गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकार आणि राज्यांना कारागृहातला जाती-आधारित भेदभाव दूर करण्यासाठी त्यांच्या कारागृह नियमावली आणि नियमांमध्ये सुधारणा करण्याचे निर्देश दिले होते.

**<><><><><>**

महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन आज मुंबईत गोरेगाव इथं राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरा करण्यात आला. महाराष्ट्र पोलीस दलाचे शौर्य अतुलनीय असून हे देशातलं आदर्श पोलीस दल असल्याचे गौरवोद्गार राज्यपालांनी यावेळी काढले.

**<><><><><>**

नव्या वर्षाच्या दुसऱ्या दिवशी देशातल्या शेअर बाजारात आज दमदार तेजी झाली. सकाळी किरकोळ तेजीने सुरू झालेले बाजार नंतर सातत्यानं वाढत गेले. व्यवहारांच्या दरम्यान सेन्सेक्सनं ८० हजारांची पातळीही ओलांडली होती. दिवसअखेर सेन्सेक्स १ हजार ४३६ अंकांची वाढ नोंदवून ७९ हजार ९४४ अंकांवर बंद झाला. सत्रादरम्यान २४ हजार २०० च्या पलीकडे गेलेला निफ्टी दिवसअखेर ४४६ अंकांची तेजी नोंदवून २४ हजार १८९ अंकांवर स्थिरावला. डिसेंबरमध्ये मोठ्या प्रमाणावर झालेल्या वाहन विक्रीमुळं वाहन कंपन्यांचे समभाग तेजीत होते. बँका आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या कंपन्यांच्या समभागांना आज जोरदार मागणी होती.

**<><><><><>**

दिवाळी, दसरा, गणपती, नाताळ, उन्हाळी सुट्या या साधारण सर्व शाळांमध्ये दिल्या जातात. पण नाशिक जिल्ह्यातल्या त्र्यंबकेश्वर तालुक्यातल्या हिवाली गावातली जिल्हा परिषदेची शाळा वर्षभर कुठल्याही सुटीशिवाय सुरू असते. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या वार्ताहरांकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट .........संजय पाठक**

**<><><><><>**

ऑलिंपिकमधे दोन पदकं जिंकणारी नेमबाज मनु भाकर, विश्वविजेता बुद्धिबळपटू डी गुकेश, पॅरा ॲथलिट प्रवीणकुमार आणि हॉकीपटू हरमनप्रित सिंह यांना यंदाचा मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. महाराष्ट्राचा नेमबाज स्वप्नील कुसाळे याला अर्जुन पुरस्कार, तर नेमबाजी प्रशिक्षक दीपाली देशपांडे यांना द्रोणाचार्य पुरस्कार जाहीर झाला आहे.

क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ३२ खेळाडूंना अर्जुन पुरस्कार जाहीर झाले आहेत. यात पॅरा ॲथलिट सचिन खिलारी याचाही समावेश आहे. पॅरा जलतरणपटू मुरलीकांत राजाराम पेटकर आणि ॲथलिट सुचा सिंह यांना जीवनगौरव अर्जुन पुरस्कार जाहीर झाला आहे. केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयानं आज पुरस्कार विजेत्यांची नावं जाहीर केली. राष्ट्रपती भवनात १७ जानेवारीला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पुरस्कार विजेत्यांना सन्मानित केलं जाईल.

दरम्यान, पुरस्कार मिळालेल्या खेळाडूंचं उपमुख्यमंत्री तसंच राज्य ऑलिंपिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांनी अभिनंदन केलं आहे.